# हॉटेल, रेस्टॉरंट असोसिएशनचे आजपासून अधिवेशन

**नाशिक :** हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया संस्थेतर्फे ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान नाशिकमध्ये संस्थेचे १९ वे विभागीय अधिवेशन होणार आहे. यानिमित्त पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील अनेक नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये येणार आहेत.

पाथर्डी फाट्यावरील रेडसन ब्लू हॉटेलमध्ये होणाऱ्या अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली.

सुमारे तीन वर्षांनंतर हे पश्चिम विभागीय अधिवेशन होत आहे. अधिवेशनात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार आहेत. विविध मान्यवर अनेक विषयांवर विचारमंथन आणि संवाद साधतील. या अधिवेशनामुळे मिळणार असून, पर्यटन क्षेत्रात महत्त्वाचे शहर असणाऱ्या नाशिकची निवड या अधिवेशनासाठी करण्यात आली आहे.